प्रेसनोट

दिनांक १८/०२/२०२५

"जिल्हाधिकारी कार्यालय भरारी पथक, पालघर मधील पोलीस शिपाई /१२४८ दत्ता माधवराव शिंदे, पोलीस शिपाई/१३२६ श्रीराम सुर्यभान डाखुरे व खाजगी इसम तृणाल मोहन धनु यांना यशस्वी सापळा कारवाई करून ताब्यात घेतलेबाबत "

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| स्टेशन डायरी क्रमांक | मांडवी पोलीस ठाणे, मिरा–भाईदर, वसई–विरार पोलीस आयुक्तालय स्टेशन डायरी नोंद क्रमांक दिनांक २४/१२/२०२४ रोजी. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) पोलीस शिपाई /१२४८ दत्ता माधवराव शिंदे,वय – ३२ वर्ष, प्रतिनियुक्ती – जिल्हाधिकारी भरारी पथक, पालघर, नेमणुक – बोईसर पोलीस ठाणे, पालघर.<br>२) पोलीस शिपाई/१३२६ श्रीराम सुर्यभान डाखुरे, वय – ३१ वर्ष, प्रतिनियुक्ती – जिल्हाधिकारी भरारी पथक, पालघर, नेमणुक – मनोर पोलीस ठाणे, पालघर<br>३) खाजगी इसम तृणाल मोहन धनु, वय – ३७ वर्ष, धंदा – चालक, राहणार – सातपाटी, पालघर. |
| आरोपी अटक | अनु क्रमांक १ ते ३ अटक |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/– रू. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,०००/– रू. |

**थोडक्यात हकीगत:–** यातील तक्रारदार यांचे भागीदारी कंपनीच्या मालकीचे खडी वाहतुक करणारे हायवा वाहन क्र. MH04 LE 9945 व त्यासोबतचे MH 48 MH 1970 हायवा वाहन शिरसाड नाका येथे पोलीस शिपाई /१२४८ दत्ता शिंदे व पोलीस शिपाई/१३२६ श्रीराम डाखुरे, दोन्ही नेमणुक जिल्हाधिकारी भरारी पथक, पालघर यांनी बेकायदेशीरपणे अडवुन सदर वाहनावर रॉयल्टी उल्लंघनाची कारवाई व वाहन जप्तीची कारवाई न करण्याची वाहन चालकास धमकी देवुन सदरची कारवाई टाळण्याकरीता प्रत्येकी हायवा वाहनाचे रू. १ लाख प्रमाणे असे एकुण २ लाख रूपये लाचेची तक्रारदार यांचेकडे मागणी केली. तक्रारदार यांची लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दि. १७/०२/२०२५ रोजी फोनद्वारे संपर्क साधुन ला.प्र.वि. पालघर येथे तक्रार केली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. १८/०२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये आलोसे अनु क्र. ०१ ते ०३ हे घटनास्थळी प्रत्यक्ष मिळुन आले असुन त्यांनी तक्रारदार यांच्याकडुन खडी वाहतुकीचे ताब्यात घेतलेले दोन्ही हायवा वाहनावर रॉयल्टी उल्लंघनाची कारवाई व वाहन जप्त न करण्याकरीता रू. ५०,०००/– लाचेची रक्कमेची मागणी केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

त्यानंतर दि. १८/०२/२०२५ रोजी पहाटे ०२:३८ वाजता आयोजीत करण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये तक्रारदार यांच्याकडुन लोकसेवक आलोसे पोलीस शिपाई /१२४८ दत्ता शिंदे व पोलीस शिपाई/१३२६ श्रीराम डाखुरे यांनी पंचासमक्ष रू. ५०,०००/– रक्कमेची लाचेची रक्कम खाजगी इसम चालक तृणाल धनु याचेमार्फतीने स्विकारतांना रंगेहाथ पकडले म्हणुन मांडवी पोलीस ठाणे, मिरा–भाईंदर, वसई–विरार पोलीस आयुक्तालय येथे गु.र.नं. ३४/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन १९८८ (सुधारीत अधिनियम २०१८) चे कलम ७ प्रमाणे दिनांक १८/०२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मार्गदर्शक अधिकारी – मा.श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री.संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र,**
**मा.श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

**संपर्क पत्ता** :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय कक्ष क्र. १०८, प्रशासकीय इमारत–'ब', जिल्हा मुख्यालय,पालघर–बोईसर रोड, कोळगाव, ता. जि. पालघर.
पिनकोड – ४०१४०४.
संकेतस्थळ :– https://www.acbmaharashtra.gov.in/
ई–मेल :– dyspacbpalghar-mum@mahapolice.gov.in
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297

( हर्षल चव्हाण )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर